मुख्य कार्यालय,
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०३

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र.: व.वि.श.म./स्थासंक/१०४६/२०२४-२५
दिनांक : ११/०३/२०२५

# जाहीर आवाहन

वसई – विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्थानिक संस्था कर (LBT) मूल्यनिर्धारण प्रलंबित असलेल्या आस्थापना धारकांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या पत्रानुसार दि.३०/०४/२०२५ पासुन स्थानिक संस्था कर विभाग कायमचा बंद करणेबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने, स्थानिक संस्था कर अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या ज्या आस्थापना धारकांचे अद्यापही कर मूल्यनिर्धारण झालेले नाही, अशा सर्व व्यापाऱ्यांनी त्यांचे कर मूल्यनिर्धारण पूर्ण करून घेणेच्या दृष्टीने प्रशासनाकडून मागविण्यात आलेले कागदपत्रांची पूर्तता संबंधित स्थानिक संस्था कर विभाग कार्यालयाकडे त्वरित करणेत यावी.

कर मूल्यनिर्धारण कार्यवाहीस प्रतिसाद न देणाऱ्या व्यापाऱ्यांचे बाबतीत नियमातील तरतुदीन्वये योग्य निर्णय शक्तीनुसार यथाशक्ती कर मूल्यनिर्धारण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. अशा व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात व्याज व शास्तीसहित दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(समीर भुमकर)
उपायुक्त, स्थानिक संस्था कर
वसई – विरार शहर महानगरपालिका